# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र-४२ दिनांक - १३/०२/२०२४

## १५ वर्षाच्या अपहृरीत मुलीचा ऋषीकेश, उत्तराखंड येथे शोध घेवुन, तीला पालकांचे ताब्यात देण्यास विरार पोलीस ठाणेचे पोलीसांना यश.

विरार पोलीस ठाणे हददीत दिनांक ०१/०२/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता रुम नं ००१ आदी लक्ष्मी कॉ. सोसायटी बालाजी नगर जावदानी रोड विरार पुर्व येथे फिर्यादी सौ. सोनी उमेश झा वय- ३१ वर्षे व्यवसाय- गृहिणी रा. रुम नं ००१ आदी लक्ष्मी कॉ. सोसायटी बालाजी नगर जावदानी रोड विरार पूर्व, ता.वसई, जिल्हा पालघर या घरामध्ये असताना त्यांची मुलगी ही तिची मैत्रीनीकडुन शाळेतील पुस्तक घेवुन येथे असे सांगुन घरातुन निघुन गेली बराच वेळ झाल्याने मुलगी परत न आल्याने फिर्यादी यांनी आजुबाजुच्या परिसरात नातेवाईकडे व मैत्रीनीकडे चौकशी केली असता मुलीबाबत काहीएक माहिती मिळून आली नाही म्हणुन फिर्यादी याना खात्री झाली की, त्यांचे मुलीला कोणीतरी अज्ञात इसमाने फुस लावुन कशाचे तरी आमिष दाखवुन कायदेशीर पालकाचे रखवालीतुन पळवुन नेले आहे. त्याबाब फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादी वरुन विरार पोलीस ठाणे.गुन्हा रजि.क्र ७८/२०२४ कलम ३६३ भादवि प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाची माहिती मिळताच मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३ यांचे आदेशान्वये व मा. सहा. पोलीस आयुक्त, विरार विभाग व मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विरार पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली अपहारीत मुलीचा शोध घेण्यास सुरुवात केली. अपहारीत मुलीचा शोध घेत असताना तांत्रीक तपासाच्य आधारे व मिळालेल्या गोपनीय माहीतीच्या आधारे मुलगी ही ऋषीकेश, राज्य- उत्तराख्ंड येथे असल्याचे निष्पन्न झाले. मा. पोलीस उप आयुक्त परि. ३ विरार याचे परवानगीने स.पो.नि सोलनकर, पो.ह. मंदार दळवी व म.पो.शि वर्षा निकम यांना तात्काळ ऋषीकेश, राज्य- उत्तराख्ंड येथे अपहारीत मुलीचा शोध घेण्यासाठी रवाना केले. तांत्रीक विश्लेषन व स्थानिक पोलींचे मदतीने अपहारीत मुलगी हीस परमार्थ निकेतन आश्रम, ऋषीकेश, राज्य- उत्तराख्ंड येथुन सुखरुप ताब्यात घेतले व विरार पोलीस ठाणेस परत आणले. नमुद गुन्हयाचा पुढील तपास विरार पोलीस ठाणेचे स.पो.नि सोलनकर हे करीत आहेत.

सदरची कामगिरी श्री.सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, विरार, श्री.रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली विरार पोलीस ठाणेचे श्री.विजय पवार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री सुशीलकुमार शिंदे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), स.पो.नि सोलनकर, पो.ह. मंदार दळवी, पो.ह. इंद्रनिल पाटील, म.पो.शि वर्षा निकम, तसेच पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, कार्यालयाचे पो.ह. नामदेव ढोणे, यांनी यशस्वीरित्या पार पाडलेली आहे.